# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

Phone No. 24010437 / 24020781
Visit us at : http://mpcb.gov.in
Email : jdwaterdivision@mpcb.gov.in

MAHARASHTRA

Kalptaru Point 2nd floor,
Sion Matunga Scheme Road
No. 8, Infant of Sion Cercal,
Sion (E), Mumbai – 400 022.

"Your Service is our Duty"

No./MPCB/JD(WPC)/ENV/PH/B- 251031-FTS-0024    Date: 31/ 10 / 2025

**To,**
**The Principal Secretary,**
**Environment & Climate Change Department.**
**Government of Maharashtra,**
**Room No. 217 (Annex) New Administration Building,**
**Mantralaya, Mumbai-400032.**

**Sub:** Proceeding of Environmental Public Hearing in respect of the **Proposed Expansion** of existing Common Biomedical Waste Treatment Facility (CBMWTF). The proposed expansion is proposed at existing Plot No. 30, BIDCO Industrial Estate, Chintupada, Palghar. It is proposed to establish additional facility (a) 1 nos. x 200 kg/hr Incineration Facility, in compliance with standards mentioned in Schedule II of Bio-Medical Waste Management Rules, 2016 and CPCB guidelines, (b) Autoclave – 1 nos. x 200 Ltrs/Batch and (c) Shredder – 1 no. x 200 Kg/Hr. Additional 360 sq. m. area will be required for the proposed expansion project. The total area after expansion will be 4,301 sq. m, **Proposed by** M/s.Touch n Glow, Palghar.

**Ref:** Sub-Regional Tarapur-II vide letter dtd-17.10.2025, Received on 27.10.2025

**Madam,**

The Public Hearing for **Proposed Expansion** of existing Common Biomedical Waste Treatment Facility (CBMWTF). The proposed expansion is proposed at existing Plot No. 30, BIDCO Industrial Estate, Chintupada, Palghar. It is proposed to establish additional facility (a) 1 nos. x 200 kg/hr Incineration Facility, in compliance with standards mentioned in Schedule II of Bio-Medical Waste Management Rules, 2016 and CPCB guidelines, (b) Autoclave – 1 nos. x 200 Ltrs/Batch and (c) Shredder – 1 no. x 200 Kg/Hr. Additional 360 sq. m. area will be required for the proposed expansion project. The total area after expansion will be 4,301 sq. m, **Proposed by** M/s.Touch n Glow, Palghar.

Environmental public hearing Conducted on dtd-18.09.2025, Time-11.00. A.M., at Shikshak Patpedhi Bhavan, Valan Naka, Kelwe Mahim Road,Palghar (W), Tal.Dist. Palghar 401404. The minutes of the public hearing approved and duly signed by the Public hearing panel along with the proceedings are enclosed.

a. Minutes of public hearing duly signed by the Chairman of public hearing panel in (English & Marathi)
b. Copy of Office Order
c. Video DVD and Photograph of Public Hearing.
d. List of participants.
e. Newspaper Notices for Environmental Public Hearing in English & Marathi.

This is submitted for further necessary action please.

**Yours Sincerely,**

**(M. Devender Singh, IAS),**
**Member Secretary**

**Encl: As above**

**Copy for information & necessary action to:**

1) The Regional Officer, MPCB, Thane.
2) The Sub Regional Office, MPCB, Thane -II
3) EIC, M.P. C. Board, Mumbai - For information & display of Minutes on website.

**Copy to the applicant of the project:**

M/s.Touch n Glow, Palghar.

**प्रकल्प प्रवर्तक मे. टच एन ग्लो, पालघर,तालुका,जिल्हा-पालघर, महाराष्ट्र यांच्या भूखंड क्रमांक ३१, बिडको औद्योगिक वसाहत, चिंटुपाडा, पालघर, तालुका,जिल्हा-पालघर, महाराष्ट्र येथील कार्यरत सामुहिक जैव-वैदकीय कचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा प्रकल्प (Common Bio-Medical Waste Treatment & Disposal Facility – CBMWTDF) ३.१५ एमटीपीडी वरुन १३.९५ एमटीपीडीपर्यत (१०.८० एमटीपीडीने वाढ) क्षमता विस्तारित करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृत्त –**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. टन एन ग्लो, पालघर,तालुका,जिल्हा-पालघर,महाराष्ट्र यांच्या भूखंड क्रमांक ३१, बिडको औद्योगिक वसाहत, चिंटुपाडा, पालघर, तालुका,जिल्हा-पालघर, महाराष्ट्र येथील **कार्यरत सामुहिक जैव-वैदकीय कचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा प्रकल्प (Common Bio-Medical Waste Treatment & Disposal Facility – CBMWTDF)** ३.१५ **एमटीपीडी वरुन १३.९५ एमटीपीडीपर्यत (१०.८० एमटीपीडीने वाढ)** क्षमता विस्तारित करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी गुरुवार दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी ११.00 वाजता वाजता प्रकल्प स्थळ – शिक्षक पतपेढी भवन, वलण नाका, केळवे माहीम रस्ता, पालघर (पश्चिम), तालुका,जिल्हा-पालघर –४०१ ४०४, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री. विरेन्द्र सिंग, उप प्रादेशिक अधिकारी, तारापूर-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तारापूर, तालुका,जिल्हा-पालघर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री सुभाष भागडे, अपर जिल्हादंडाधिकारी, पालघर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री किरण हसबनीस, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ठाणे तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, विविध चॅनलचे प्रतिनिधी, पोलिस प्रशासन व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर आणि महाराष्ट्र

प्रदूषण नियंत्रण मंडळ, पालघर कार्यालय यांच्यातर्फ स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचना व दिनांक १७ एप्रिल, २०१५ च्या सुधारित अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देशच प्रकल्प परिसरातील जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की **प्रकल्प प्रवर्तक मे. टच एन ग्लो, पालघर,तालुका,जिल्हा-पालघर, महाराष्ट्र** यांचा त्यांच्या कार्यरत असलेल्या **भूखंड क्रमांक 31, बिडको औद्योगिक वसाहत, चिंटुपाडा, पालघर, तालुका,जिल्हा-पालघर, महाराष्ट्र** येथील कार्यरत सामुहिक जैव-वैदकीय कचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा प्रकल्प (Common Bio-Medical Waste Treatment & Disposal Facility – CBMWTDF) ३.१५ **एमटीपीडी वरुन १३.९५ एमटीपीडीपर्यत (१०.८० एमटीपीडीने वाढ)** क्षमता विस्तारित करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांचा दिनांक १५.०७.२०२५ रोजीचा अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण अधिसूचना व दिनांक १७ एप्रिल, २०१५ च्या सुधारित अधिसूचनेनुसार संवर्ग ब – अनुसूची 7 (डी) (ए) अंर्तगत मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण (SEIAA),

पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक १४.०९.२०२४ रोजी सादर केला व त्यास अर्जास महाराष्ट्र शासनाने ऑनलाईन मंजूरी दिनांक ०१.१०.२०२४ रोजी प्रदान केली.

त्यानुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या निर्देशांनुसार नाबेट मंजूरी प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार यांची नियुक्त करून पर्यावरण सल्लागार यांच्याव्दारे प्रकल्प स्थानाच्या १०.० किमी त्रिज्येमध्ये तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण ०१ जानेवारी, २०२५ ते ३१ मार्च, २०२५ (तीन महिने) या कालावधीत पुर्ण करण्यात आले. प्रस्तावित प्रकल्प स्थापनेमुळे पर्यावरणावर होणा-या संभाव्य परिणामाचा/आघातांचा अभ्यास करण्यासाठी प्रकल्पाच्या जागेचा आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला आणि तो सादर करण्यात आला.

उप प्रादेशिक कार्यालय, तारापूर-2, एमआयडीसी वसाहत परिसर, पोस्ट-टीएपीपी, बोईसर (पश्चिम),तालुका,जिल्र्हा-पालघर – 401 504 यांनी पत्र दिनांक २१.०७.२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी, पालघर यांना सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची विनंती केलेली होती.

मा. अपर जिल्हादंडाधिकारी,पालघर यांनी त्यांच्या पत्र दिनांक १२.०८.२०२५ नुसार प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी गुरुवार, दिनांक 18 सप्टेंबर, 2025 रोजी सकाळी 11.00 वाजता प्रकल्प स्थळ – शिक्षक पतपेढी भवन, वलण नाका, केळवे माहीम रस्ता, पालघर (पश्चिम), तालुका,जिल्हा-पालघर – 401 404, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यास मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी

कार्यालयीन आदेश क्रं. ई- 64 / 2025, व्दारा पत्र क्रं. बीओ / जेडी (डब्लुपीसी)/पीएच/बी-250821-एफटीएस-0212, दिनांक 21-08-2025 अन्वये भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना एस.ओ. क्रं. 1533, दिनांक 14-09-2006 व सुधारित अधिसुचना एस. ओ. 3067 (इ), दिनांक 01-12-2009 अनुसार खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

| | |
|---|---|
| 1) जिल्हादंडाधिकारी, पालघर,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | **-अध्यक्ष** |
| 2) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी —<br>प्रादेशिक अधिकारी - ठाणे,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>ठाणे | **-सदस्य** |
| 3) उप प्रादेशिक अधिकारी,तारापूर-2,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>बोईसर (पश्चिम),<br>तालुका,जिल्हा-पालघर | **-आयोजक** |

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, तारापूर-2, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, एमआयडीसी वसाहत परिसर, पोस्ट-टीएपीपी, बोईसर (पश्चिम), तालुका,जिल्हा-पालघर-401 504, महाराष्ट्र यांनी जनसुनावणी दिवसाच्या 30 दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकमत यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र फ्री प्रेस जर्नल यात इंग्रजीत दिनांक 18 ऑगस्ट , 2025 रोजी प्रस्तावित प्रकल्पाबाबत जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती.

तसेच सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (notified)/ कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते —

१) प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य झोन, न्यु सेक्रेटरीएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन्स, नागपूर 440 001
२) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,पालघर,
३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पालघर,
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय,पालघर,
५) उप विभागीय अधिकारी, तालुका,पालघर, जिल्हा-पालघर,
६) तहसीलदार, तहसील कार्यालय,पालघर,जिल्हा-पालघर,
७) गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,पालघर,जिल्हा-पालघर,
८) सरपंच/ग्रामसेवक ग्रामपंचायत-माहिम,तालुका,जिल्हा-पालघर
९) संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, 15 वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई 400 032.
१०) सहसंचालक (जप्रनि), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, सिनेप्लॅनेट सिनेमासमोर, 3रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. 8, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई - 400 022
११) प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,ठाणे
१२) उप प्रादेशिक अधिकारी,तारापूर-2, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रणमंडळ,एमआयडीसी वसाहत परिसर, पोस्ट-टीएपीपी, बोईसर, तालुका, जिल्हा पालघर-401 504
१३) संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई – मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध केलेला आहे.

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, पालघर-2 यांना एकही सूचना/आक्षेप विविध सूचित कार्यालयाकडून/प्रत्यक्ष/पोस्टाने दि. १७.०९.२०२५ पर्यंत प्राप्त झालेले नाही.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. स्थानिक जनतेने

जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची बैठकीच्या इतिवृतात नोंद घेण्यात येईल व बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग, जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप, बैठकीचे इतिवृत्त हा सर्व दस्तावेज पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी मा. अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (Environment Management Plan) सादरीकरण केले.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. टन एन ग्लो, पालघर,तालुका,जिल्हा-पालघर,महाराष्ट्र यांच्या भूखंड क्रमांक 31, बिडको औद्योगिक वसाहत, चिंटुपाडा, पालघर, तालुका,जिल्हा-पालघर, महाराष्ट्र येथील **कार्यरत सामुहिक जैव-वैदकीय कचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा प्रकल्प (Common Bio-Medical Waste Treatment & Disposal Facility – CBMWTDF) 3.15 एमटीपीडी वरुन** 13.95 **एमटीपीडीपर्यत** (10.80 **एमटीपीडीने वाढ)** क्षमता विस्तारित करणे नियोजित केलेले आहे. प्रस्तावित प्रकल्पास खर्च रुपये 1.70 कोटी एवढा होईल, तर विस्तारिकरणामुळे अतिरिक्त 20 व्यक्तींना रोजगाची संधि मिळणार आहे. प्रकल्पात शासनाच्या निर्देशांनुसार हरितपट्टा विकसित करण्यात येणार आहे. पर्यावरण सल्लागार यांनी सर्व तांत्रिक बाबींचे विश्लेषण सादरीकरणाव्दारे केले.

सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी ,पर्यावरणविषयक सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. आपली भूमिका मांडताना प्रथम आपले नांव, गावाचे नांव सांगण्यात यावे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की आपण उपस्थित करण्यात येणा-या मुद्द्यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येणार आहे, तसेच सदरहू जनसुनावणीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येणार आहे.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

1) **प्रीती अरुण पाटील, सरपंच, ग्रामपंचायत, माहिम, तालुका, जिल्हा-पालघर:-**

येथे कार्यरत प्रकल्प टच एन ग्लो या कंपनीच्या विस्तारीकरणाबाबतची पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. त्याबाबतचे सादरीकरण बैठकीत दाखविण्यात आलेले आहे. प्रस्तावित विस्तारीकरणाच्या अहवालाची प्रत आम्हांला उपलब्ध करण्यात आलेली होती. त्याचा अभ्यास करुन आम्ही 23 (तेवीस) मुद्दे काढलेले आहेत.

मात्र ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित केल्यानंतर आम्ही मे. टच एन ग्लो प्रकल्पास माहिम ग्रामपंचायत सरपंच, सर्व पदाधिकारी, सर्व ग्रामस्थ यांनी प्रकल्पास भेट देऊन पाहणी केलेली आहे. आमच्या भेटीत जे दर्शनी दिसले, त्याबाबत मी भाष्य करु इच्छिते.

आम्ही प्रकल्प स्थानास भेट दिल्यावर असे लक्षात आले की सदरहू प्रकल्प हा "रेड झोन" क्षेत्रात आहे. तरीही प्रकल्पाच्या जवळ व प्रकल्पाच्या गेटवर कंपनीच्या नावाचाही दर्शनी फलक (Name Board) नव्हता. तसेच प्रकल्पाच्या उपक्रमाबद्दल काहीही माहिती लिहिलेली

नव्हती.   प्रकल्पाच्या आतील भागात जे पीएच मीटर लावलेले होते, ते  कार्यरत (working stage) नव्हते. प्रकल्पात ईटीपी कार्यरत आहे, असे त्यांचे म्हणणे होते.  मात्र ईटीपी व्यवस्थित चालत असेल, असे निर्दशनास आले नाही.

त्यांना प्रकल्पातील प्रक्रियेसाठी दर दिवशी किती पाणी आवश्यक आहे आणि आपणास दर दिवशी किती पाण्याचा उपसा करण्यास परवानगी आहे याबाबत विचारणा केली असता  त्यामध्ये तफावत आढळून आली.

तसेच प्रकल्पात होणारे सांडपाण्यावर प्रक्रिया करुन प्रकल्पातील हरितपट्ट्यासाठी त्याचा पुनर्वापर करण्यात येतो अशी माहिती प्रकल्प प्रवर्तक यांनी जरी आम्हांला सांगितले असले तरीही प्रकल्पात हरितपट्टा/बगिचा दिसला नाही.  अगदी 10-12 छोटी रोपटी लावलेली दिसली.  प्रकल्पात कोठेही बगिचा/हरितपट्टा दिसला नाही.

प्रकल्पात वैदकीय कच-याची विल्हेवाट लावण्यात येते, मात्र प्रकल्प स्थानात ज्या गांभीर्याने पारित सूचना पाळत नसल्याचे आढळून आलेले आहे.  ही वरवर केलेल्या पाहणीचा निष्कर्ष आहे.  त्यामुळे आता जो कार्यरत प्रकल्प आहे, त्याच्या कार्यशैलीत प्रथम सुधारणा करण्यात यावी.  हे जास्त योग्य होईल.

प्रकल्प प्रवर्तकांकडे त्यांच्या कार्यालयात जे काही लेखी माहिती/ मुद्दे मागितले असता असे दिसून आले की प्रकल्प कार्यालयात त्याबाबतची माहिती उपलब्ध नव्हती.  जी माहिती आवश्यक होती, ती ते सादर करु शकले नाहित.

सगळयात महत्वाचा भाग म्हणजे आज ही जनसुनावणी आजोजित करण्यात आलेली आहे, मात्र गेले दोन वर्षात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या  अधिका-याने  कुठलीही पाहणी केल्याचे  आढळून आलेली नाही. जर आज प्रकल्प विस्तारिकरणाची जनसुनावणी आहे, तर कार्यरत प्रकल्पाची सद्यस्थिती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने स्थानिकांना अवगत करणे अपेक्षित आहे.  ते करण्यात आलेले नाही.   आम्ही प्रकल्प भेटीत प्रकल्प प्रवर्तकांना

अभ्यागतांचे रजिस्टर, तसेच पाहणी अहवालाची माहिती मागितली असता ती ते देऊ शकले नाहीत.

आम्ही पाहणी केल्यानंतर असे ग्रामस्थांच्या लक्षात आले की कंपनीने विस्तारिकरणासाठी तयार केलेला अहवाल ही फक्त कागदोपत्री आहे. मात्र प्रत्यक्षात स्थिती ही खूपच वेगळी आहे.

तरी आता असलेला कार्यरत प्रकल्प प्रथम सुरळीत करुन घ्यावा. प्रकल्पात ज्या त्रुटी आहेत, त्यात सुधारणा करण्यात यावी. यासाठी आम्ही 23 मुद्द्यांसोबत काही अतिरिक्त मुद्दे काढलेले आहेत. आम्ही ते मुद्दे मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अपर जिल्हाधिकारी,पालघर यांना सादर करीतच आहोत.

मात्र माझी सूचना आहे की कार्यरत प्रकल्पातील त्रुटी प्रथम दूर करण्यात याव्यात, तसा अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सादर करावा, नंतरच प्रकल्प विस्तारीकरणाची पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही आयोजित करण्यात यावी.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रीती अरुण पाटील, सरपंच, ग्रामपंचायत, माहिम यांना सूचना केली की त्यांनी 23 मुद्द्यांचे लेखी निवेदन सादर करावेत. त्याची पोच देण्यात येईल. सदरहू लेखी निवेदन पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीच्या इतिवृत्तासोबत शासनास सादर करण्यात येईल.

2) **<u>श्री सुजय मोरे, राहणार-माहिम गांव,तालुका,जिल्हा-पालघर:-</u>**

मी National Alliance of People's Movement या संघटनेचा कोकण विभागाचा समन्वयक आहे. मी एकच प्रश्न विचारायचा आहे की ज्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवाल तयार केला, ते उपस्थित आहेत काय? उपस्थित प्रश्नांना ते उत्तरे देणार आहेत की फक्त प्रश्नांची नोंदच घेतली जाणार आहे?

पर्यावरण सल्लागार यांनी येथे स्वःताची ओळख करुन दिली.

3) **<u>श्री मिलिंद म्हात्रे, माहिम ग्रामस्थ, तालुका, जिल्हा-पालघर- पालीपाडी रहिवाशी:-</u>**

मा. सरपंच मॅडम यांनी ज्यावेळी या प्रकल्पास भेट दिली, त्यावेळी त्यांच्याबरोबर आम्ही ग्रामस्थ बरोबर होतो. सादरीकरणात जे दर्शविण्यात आलेले आहे, त्यात व प्रत्यक्ष प्रकल्प स्थानात ब-याच प्रमाणात विसंगती आहे. किंबहुना माझे मत झालेले आहे की प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्प स्थानावरच कधिही भेटच दिलेली नाही असे मत आहे. कारण सादरीकरणात जे दर्शविण्यात आलेले आहे, ते प्रकल्प स्थानावर अस्तित्वातच नाही.

श्री. मिलिंद म्हात्रे यांनी सांगितले की मा. सरपंच मॅडम बरोबर पाहणी केली असता असे निदर्शनास आले की कार्यरत प्रकल्पात वैधानिक प्रदूषण नियंत्रण साधने (Statutory pollution control devices) कार्यरत नाहीत. म्हणजे प्रकल्पाच्या बाहेर

अनुपालन केलेल्या (compliance) बाबीचे फलक दर्शनी भागावर लावलेल्या नव्हत्या. आम्ही प्रकल्पात भेट देण्यास गेलो असता अभ्यागत वही तपासली असता गेले दोन वर्षे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी तपासणी करण्यास गेलेले आढळले नाही. आता कार्यरत प्रकल्पाचे पाचपट विस्तारिकरण आहे, म्हणजे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांनी प्रकल्पातील सुविधा तपासणी करणे योग्य होते. ही ग्रामस्थ म्हणून माझी मागणी आहे.

तसेच प्रकल्पात स्थापित करण्यात आलेला ईटीपीचा इनलेट पी.एच. – 3.0 आहे. तसेच आऊटलेटचा पी.एच. – 3.0 आहे. याचा अर्थ ईटीपी कामच करत नाही. तेथे पाण्याचा रंग हा पूर्णपणे काळा (black) होता. प्रकल्प स्थानावर अस्वच्छता प्रचंड प्रमाणात आहे. तेथील कुठल्याही कामगारांना हॅन्ड ग्लोज वापरताना आम्ही पाहिलेले नाही. तेथे काहीच नाही.

प्रकल्पात इन्सिनरेटर पाहिला. तर जो धुर वर 30 मीटर चिमणीतून वातावरणात जायला पाहिजे होता, तो खालून निघत होता, म्हणजे इन्सिनरेटरला पूर्णपणे गळती लागलेली

होती. आम्हांला फोटो काढण्यास मनाई केली, फोटो काढले असते, तर ते आता उपलब्ध करण्यात आले असते.

श्री मिलिंद म्हात्रे यांनी सांगितले की प्रकल्पात बगिचासाठी भूखंड/जागाच नाही. प्रकल्प प्रवर्तकांनी जो बगिचाचा भूखंड दाखविला, तो रस्त्याच्या दुस-या बाजूला कचरा असलेला भूखंड तो बागेचे भूखंड दाखविला, तो 150.0 स्केअर मीटर आहे. तेवढा तो निश्चितच नाही.

गेले महिनाभर या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीची तयारी चालू असेल, त्या काळात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांनी पाहणी करुन पाहणी अहवाल सादर करणे अपेक्षित होते. तसे करण्यात आलेले नाही.

कार्यरत प्रकल्प 3.15 एम.टी. प्रति दिन क्षमतेचा आहे. विस्तारिकरण झाल्यानंतर प्रकल्पाची क्षमता होणार आहे 13.95 एम.टी.प्रति दिन एवढी होणार आहे. प्रकल्पाचा भूखंड सध्या 3,941 चौरसमीटर आहे. 360.0 चौरस मीटर अतिरिक्त भूखंड घेण्यात येणार आहे. त्यानंतर एकूण क्षेत्रफळ हे 4,301.0 चौरस मीटर एवढे होईल. ते कोठेही आनुपातिक (Proportionate) नाही. आनुपातिक (Proportionate) बघितले तर खूप मोठी जागा लागेल असे आम्हांला वाटते. हरित पट्टा नाही. त्यासाठी सिमांकन (demarcation) केलेले नाही. घनकचरा (solid waste) तळोजाला जाते असे म्हणतात. पण ते जाते असे ते कुठेही दाखवू शकत नाही. कुठेही त्याची नोंद नाही की एखाद्या विभागात घनकचरा (solid waste) निर्माण होतो व तो तळोजाला पाठविण्यात आला. महिन्याला एवढी राख तयार होते व एवढी राख ही तळोजाला पाठविण्यात येते अशी कुठेही नोंद दिसली नाही. कारण या कार्यरत प्रकल्पात कुठेही प्रयोगशाळाच नाही. त्यामुळे तेथे कुठलेही पृथ्थकरण होत नाही.

प्रकल्प प्रवर्तक सांगतात की कार्यरत प्रकल्पात 5.0 केएलडी पाणी वापरण्यात येते. विस्तारिकरणानंतर एकूण पाण्याची आवश्यकता ही 15.0 केएलडी एवढी होईल. पण

आमच्या पाहणीत पाणी कुठे वापरतात ते दिसले नाही व रोज किती वापरता यास ते समाधानकारक उत्तरे प्रकल्प प्रवर्तक देऊ शकलेले नाहीत.

प्रकल्पात वैदकीय कचरा हा इन्सिनरेट होतो, त्यात $SO_२$ , $CO_२$ कार्बन-मोनाक्साईड, Ammonia सारखे घातक वायू निर्माण होणार आहेत. याची माहिती प्रकल्पाच्या ईआयए मध्येच आहे. हे सर्व घातक वायू चिमणीतून माहिम परिसरात पसरतात. त्याचा अनुभव आम्ही घेत आहोत. रात्रीच्या वेळी आम्ही येथील स्थानिक रात्रीच्या वेळी विविध जे वासांनी (smell nuisance) बाधित झालेलो आहोत.

प्रकल्प प्रवर्तक प्रकल्पातील विविध सुविधांसाठी पाणी वापरल्यानंतर प्रक्रिया केलेले सांडपाणी बगिच्यात सोडण्यात येणार आहे. तेथून 100.0 मीटर अंतरावरच आमची पाणेरी नदी आहे. तेथे सांडपाणी पाझरुन (percolation) ते पाणेरी नदीत मिसळते. मात्र प्रकल्पाच्या अहवालात येथे कोठेही जवळपास जलस्त्रोत नाही असा उल्लेख आहे.

येथे भाईंदर, मीरारोड,वसई येथून जैव-वैदकीय कचरा येतो. आमची मागणी आहेत तेथील जैव-वैदकीय कच-यावर त्या क्षेत्रातच म्हणजे भाईंदर, मीरारोड,वसई येथेच प्रक्रिया करण्यात यावी. एवढ्या लांब येथे आणण्याची आणि येथे प्रदूषण वाढविण्याची काय आवश्यकता आहे?

तसेच प्रकल्प पाहणी दरम्यान कामगारांना कुठलेही PPEs उपलब्ध केलेली आढळून आलेली नाहीत. त्याच्यावर येणा-या जोखमीचा विचार करण्यात आला पाहिजे.

प्रकल्पाच्या 96 नंबर पानावर इन्सिनरेटरने होणारे जे तोटे आहेत, त्याची माहिती दिलेली आहे. त्यात पार्टिक्युलेट मॅटर आहे. ते ब-यापैकी निघते. ते सगळे इन्सिनरेट होत नाही. HCl म्हणजे हायड्रो-क्लोरिक एसिड, SO२, CO, ToC, Hg, Hydrogen fluoride, Nitrogen Oxide, हे प्रदूषणात वाढच करते. ते माहिम मध्येच येते. कारण वारा हा पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहत असतो. याचा प्रतिकूल परिणाम येथे होत असतात. हे पर्यावरण सल्लागाराच्या अहवालातच लिहिलेले आहे. त्यामुळे एवढे सगळे मुद्दे असताना कार्यरत

प्रकल्पाची क्षमता तिप्पट किंवा पाचपट करण्यापेक्षा प्रथम कार्यरत प्रकल्पच कार्यक्षमतेने चालविणे महत्वाचे आहे. त्यामुळे माहिम गावाचे प्रदूषण एकदम कमी होईल. नंतर त्यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण करावे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प सल्लागार यांना श्री मिलिंद म्हात्रे यांनी उपस्थित केलेल्या शंका, आक्षेप यांना स्पष्टीकरण देण्याची सूचना केली.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की तळोजाच्या अधिसूचित

Common Hazardous Waste Treatment Storage & Disposal Facility

जी मुंबई वेस्ट मॅनेजमेंट, तळोजा, नवी मुंबई हे प्रकल्प प्रवर्तक आहेत, तेथे ती राख पाठविण्यात येते. त्याबाबतचा करार व सर्व दस्तावेज (documentation) यांचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समावेश करण्यात येईल.

त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांकडे ऑनलाईन मॅनिफेस्ट आहेत.

4) **<u>श्री अरुण पाटील, माजी सरपंच, ग्रामपंचायत माहिम, तालुका, जिल्हा-पालघर:-</u>**

ज्यावेळी मा. सरपंचमहोदया, त्याच्याबरोबर ग्रामस्थ प्रकल्प स्थानावर उपस्थित होते. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक तेथे उपस्थित होते. आम्ही मागितलेली एकही कागदपत्रे ते देऊ शकले नाहीत. आजच्या जनसुनावणीच्या अगोदर जर संबंधित कागदपत्रे उपलब्ध झाली असती,तर त्याचा अभ्यास करता आला असता. आज जनसुनावणीत प्रकल्प प्रवर्तक जर ती कागदपत्रे उपलब्ध करत असतील, तर आम्हांला अभ्यासाला वेळच मिळत नाही. या गोष्टींची नोंद घेण्यात यावी.

त्यावेळी **श्री मिलिंद म्हात्रे यांनी मागणी** केली की प्रकल्प पर्यावरण सल्लागार हा प्रकल्प विस्तारिकरणासाठी आहे. मात्र कार्यरत प्रकल्पाची सद्यस्थिती ही त्या विभागाच्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या उप प्रादेशिक अधिकारी यांनी येथे जनतेसमोर सांगावी.

त्यावेळी **श्री अरुण पाटील, माजी सरपंच, ग्रामपंचायत माहिम**, तालुका, जिल्हा-पालघर यांनी सांगितले की मी मिलिंद म्हात्रे व मा. सरपंच महोदया यांनी विचारलेल्या प्रश्नात उपप्रश्न विचारतो की सदरहू प्रकल्पास मागच्या दोन वर्षात स्थानिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयातील संबंधित अधिका-यांनी भेट व पाहणी केली होती काय?

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी माहिती दिली की मनुष्यबळ कमी असल्याने संबंधित प्रकल्पास भेट देण्यास विलंब झाला.

5) **श्री मिलिंद म्हात्रे यांनी** परत आक्षेप नोंदविला की वैधानिक आवश्यकता (statutory requirement) सुध्दा प्रकल्प प्रवर्तक यांनी पूर्ण केलेली नाही. पहिली म्हणजे प्रकल्पाचे नांव व सुविधांबाबात माहिती दर्शनी भागावर व कंपनीच्या जवळ लावलेली नाही. तर त्याचे उत्तर मिळू शकेल का की त्यांनी नामफलक का लावलेला नाही? कोणीच तेथे जाणार नसेल तर पुढे कोण जाऊन पाहणी करणार?

6) **श्री अरुण पाटील, माजी सरपंच, ग्रामपंचायत माहिम**, तालुका, जिल्हा-पालघर यांनी प्रश्न विचारला की जर प्रकल्प नामफलक (Board) लावणे हे बंधनकारक असताना गेले पंधरा वर्षे तो कंपनीने लावलेला नाही, तर प्रकल्प विस्तारिकरणाचा कंपनीचा अधिकारच नाही. तर ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही त्वरित स्थगित करावी ही माझी मागणी आहे.

7) **सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की नामफलक (Board) लावणे हे प्रत्येक कंपनीस बंधनकारक आहे. आपण उपस्थित केलेल्या आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा बैठकीच्या इतिवृतात समावेश करण्यात येऊन शासनास सादर करण्यात येईल.

8) **आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी उपस्थितांना सांगितले आज किंवा उद्या स्थानिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तारापूर येथील

क्षेत्र अधिकारी सदरहू प्रकल्पास भेट देऊन आपण येथे उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप याबाबत अनुपालन (compliance) करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

9) **श्री मिलिंद म्हात्रे यांनी** परत आक्षेप नोंदविला की बैठकीत सूचना,आक्षेप अनुपालन (compliance) करण्याचे सांगितले. तर आम्ही जेव्हा प्रकल्पास भेट दिली, त्यावेळी तेथे 3.0 पी.एच. होता, आम्हांला बाजूला घेतल्यानंतर आम्ही परत पाहिला, तर 10.50 पी.एच.झालेला होता. तर आता ते व्यवस्थित ठेवतील, तर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने अचानक भेट देऊन पाहणी करावी.

10) **श्री अरुण पाटील, माजी सरपंच, ग्रामपंचायत माहिम, तालुका,जिल्हा-पालघर यांनी सांगितले** की मागच्या एक महिन्यापूर्वी एका कंपनीचा झिरो लिक्विड डिस्चार्ज ऐवजी पूर्ण सांडपाणी हे प्रकल्पाबाहेर सोडण्यात येत होते. त्याचे नमुने घेऊन ते महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास विश्लेषणासाठी पाठविण्यात आलेले आहेत. त्यावेळी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही प्रस्तावित प्रकल्पाविषयी असल्याने प्रस्तावित प्रकल्पाविषयीच सूचना, विचार, टीकाटिप्पणी व आक्षेप नोंदविण्याची सूचना केली.

11) <u>**श्री विकास मोरे,माजी सरपंच, माहिम, तालुका,जिल्हा-पालघर:-**</u>

येथील सरपंच महोदया, ग्रामपंचायतीतील सद्स्य, श्री मिलिंद म्हात्रे यांनी मे. टच एन् ग्लो या प्रकल्पास भेट देऊन पाहणी केली. त्यावेळी त्यांनी पाहिलेली सदस्यस्थिती बैठकीत सविस्तर सांगितलेली आहे. बैठकीच्या सुरवातीस आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले आपण आमचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक काही सूचना, विचार किंवा आक्षेप नोंदविण्यास आलेले आहोत. त्यांची नोंद घेऊन बैठकीच्या इतिवृत्तात त्याचा समावेश करण्यात येईल व ते महाराष्ट्र शासनास पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल. सरपंचमहोदया यांनी जे 23 मुद्दे तयार केलेले

आहेत, ते आपणास सादर करण्यात येतीलच. आम्ही या विषयातील तज्ज्ञ नाहित. आम्हांला एवढेच कळते ही वसई-विरार महानगरपालिका,मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातून गोळा केलेला वैदकीय कचरा आमच्या माहिम गावात प्रक्रियेसाठी आणणार आहेत. आमची ही मागणी आहे की जी कार्यरत वैदकीय कचरा प्रक्रिया सुविधा आहे, ती प्रथम कार्यक्षम करण्यात यावी. मी स्वत: 2-3 वेळा त्या सुविधेस भेट दिलेली आहे. तेथील कामगार हे आमच्या आदिवासी पाड्यातीलच आहेत. तेथील कामगारांना काहीही सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत. त्यांच्यासाठी व प्रकल्प परिसरातील गावक-यांसाठी प्रकल्प प्रवर्तक यांनी कधिही वैदकीय शिबिर आयोजित केलेले नाही. येथे काही दुर्घटना झाल्यास, त्यास जबाबदार कोण राहिल? आपण जे निवदेन घेणार किंवा त्याबाबत पुढील काय कार्यवाही करण्यात येईल?

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्पष्टीकरण दिले की या बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करुन, बैठकीत प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप व सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप तसेच मा. सरपंच महोदया यांनी दिलेले 23 मुद्दे त्यास प्रकल्प प्रवर्तक यांनी दिलेली उत्तरे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या मान्यतेने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्यातर्फे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती ही याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

त्यावेळी श्री विकास मोरे यांनी मागणी केली की मा. सरपंच महोदया यांनी जे 23 मुद्दे दिलेले आहेत, त्याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्पष्टीकरण दिले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सर्व मुद्द्यांची नोंद घेण्यात येत असते, त्याचप्रमाणे व्हिडिओ रेकॉर्डिंगसुध्दा चालू आहे. बैठकीचे इतिवृत्त अध्यक्ष यांच्या मान्यतेने मुख्यालय,

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्यातर्फे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सादर करण्यात येते. तेथील निर्णय घेणारी समिती येथे उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांचा सर्व विचार करुनच पुढील निर्णय घेत असते. त्यामुळे तेच तेच मुद्दे उपस्थित करण्यात येऊ नये. आपण प्रस्तावित प्रकल्पाबाबत तांत्रिक, पर्यावरणीय मुद्दे उपस्थित करु शकता, त्याची नोंद घेण्यात येते.

दुसरा मुद्दा येथे उपस्थित झाला की तेथील कचरा हा वसई-विरार महानगरपालिका,मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातून गोळा केलेला वैदकीय कचरा आमच्या माहिम गावात एवढी वाहतुक करुन कशाला आणता, त्याची प्रक्रिया ही तेथेच करण्यात यावी. येथील सुविधा प्रथम कार्यक्षम करण्यात यावी.

१२) **श्री सुजय मोरे, राहणार-माहिम गांव,तालुका,जिल्हा- पालघर:-**

प्रकल्प प्रवर्तकांना जो टर्मस् ऑफ रेफरेन्स प्राप्त झालेला आहे, त्यात पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र उदघृत्त करण्यात आलेले आहे. या भागात दूत नदी, देवकुभ धरण, केळवा धरण आणि अरबी समुद्र आपण लिहिलेले आहे. यात काही राहिलेले आहे काय?

त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर देताना सांगितले की आपण मुद्दा मांडला तो ecological bio-diversity चा आहे, तर पाण्याचे नमुने हे भूपृष्ठावरिल पाण्याचे (Surface water) घेण्यात आलेले आहे. भूपृष्ठावरिल पाण्याचे नमुने हे वेगळ्याप्रकारे घेतले जातात.

श्री सुजय मोरे यांनी आक्षेप नोंदविला की आपणास water bodies कुठल्या आहेत हे सांगावयाचे असताना तुमच्या प्रकल्पाच्या अगदी 5-10 मीटर अंतरावर पाणेरी नदी आहे. मात्र पाणेरी नदीचे नांव अहवालात नाही. त्याचे कारण काय, ही अपुरी माहिती का?

स्थानिकांची कळकळ लक्षात घेण्यात यावी.

अहवालात लिहिलेले आहे की -

Area already subjected to pollution or environmental damage those who are existing legal environmental standards are exceeded असा प्रश्न आहे.

तर त्याच्या आपण लिहिलेले आहे की –

There is no area already subjected to pollution or environment will damage within १५ k.m. radius.

हे तुमचे उत्तर बरोबर आहे का?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की याबाबत जी अधिसूचना पारित करण्यात आलेली आहे, त्यात 5.0 कि.मी. ची माहिती द्यायची आहे, 15.0 कि.मी. ची नाही.

श्री सुजय मोरे यांनी आक्षेप नोंदविला की आपल्या टी.ओ.आर. मध्येच नमुद केलेले आहे. तसेच हे सर्व इतिवृत्त ईएसी कडे जाणार आणि खोटी माहिती दिली आहे ते सिध्द झाले तर आपणास परत ईआय़ए अहवाल तयार करावा लागेल. ईआयए च्या मुद्दा क्रं 8 उप मुद्दा 7 मध्ये याबाबत माहिती आहे. – Rejection of ToR. आपण 15.0 कि.मी. परिघात काहीही नाही असे टीओआरमध्ये दिलेले आहे, आणि एमआयडीसीचे हवाई अंतर (aerial distance) हे 13 कि.मी. आहे.

यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा प्रारुप आहे. बैठकीतील सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येऊन नंतरच अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यात येत असतो.

नंतर पान नं. 52 – Air Ambient Quality Results

PM १० and PM २.५ हे आपण सादरीकरणात सांगितले की सर्व पॅरामिटर्स ही पारित मानकांमध्येच आहेत. आमचा लढा पाणेरी बाबत चालू आहे, त्यावेळी आम्हीसुध्दा पीएम 10 तपासले होते, ते 200 आलेले होते.

आपण जे आठ ठिकाणी नमुने गोळा केले, ते ठिकाणे निश्चित करताना आपण कोणाचा सल्ला घेतला होता आणि त्यावेळी तुमच्या बरोबर स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रतिनिधी उपस्थित होता का? ते नमुने कोणी गोळा केले?

त्यावेळी प्रकल्प सल्लागार यांनी माहिती दिली की हे सर्व नमुने एनएबीएल मान्यताप्राप्त प्रयोगशाळेव्दारे गोळा करण्यात आलेले आहेत.

त्यावेळी श्री सुजय मोरे यांनी विचारणा केली की सर्वेक्षण करताना स्थानिक लोकांचा सहभाग होता का, कारण सर्वेक्षण हे (Public Consultation) सार्वजनिक सल्लामसलतीचा भाग असतो.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की (Public Consultation) सार्वजनिक सल्लामसलतीत मतांतरे असतात, त्यामुळे क्वचितच एकमत होते. Public Consultation म्हणजे हीच Public Hearing आहे. ती सर्वांसाठी, पदाधिका-यांसाठी, सामान्य नागरिकांसाठी खुली आहे.

श्री सुजय मोरे यांनी मत मांडले की आम्ही केलेले हवा प्रदूषण सर्वेक्षणात प्रदूषण हे आढळलेले होते. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी त्याची नोंद घेतल्याचे सांगितले. हा प्रारुप ईआयए आहे, अंतिम तयार करुनचे तो शासनास सादर करण्यात येतो आणि तो वेबसाईटवरसुध्दा उपलब्ध करण्यात येतो.

12) **<u>श्री अरुण पाटील, माजी सरपंच, ग्रामपंचायत माहिम, तालुका,जिल्हा-पालघर यांनी सांगितले की –</u>**

आम्ही या कंपनीला आठ दिवसांपूर्वी भेट दिलेली होती. त्यावेळी मा. सरपंच महोदया, ग्रामपंचायत सदस्य, श्री मिलिंद म्हात्रे व मी अरुण पाटील यांची समावेश होता. आम्ही साधे प्रश्न विचारले, त्यात एकही तांत्रिक मुद्दा नव्हता. तर यात असे निर्दशनास आले की कंपनीने छोट्या छोट्या बाबींमध्येही लक्ष दिलेले नाही. हा मुद्दा अधोरेखित करण्यात यावा.

तसेच जे प्रस्तावित क्षेत्र आहे, ते 360.0 चौरस मीटर आहे. म्हणजे एकूण प्रकल्प क्षेत्र हे 4,301.0 चौरस मीटर आहे. हे बरोबर आहे का?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की कार्यरत प्रकल्पाचे क्षेत्र 3,941.0 चौरस मीटर आहे. प्रस्तावित क्षेत्र आहे, ते 360.0 चौरस मीटर आहे. म्हणजे एकूण प्रकल्प क्षेत्र हे 4,301.0 चौरस मीटर आहे.

श्री अरुण पाटील यांनी आक्षेप नोंदविला की आता जर त्या कंपनीत गेलात तर एकही इंच जागा खुली नाही. जरी 360. चौरस मीटर अतिरिक्त जागा घेणार, पण क्षमता पाचपट वाढविणार आहे. हा मुद्दा अधोरिखित करण्यात यावा.

<u>**पान नं. 4 — मुद्दा क्रं. 5 — घनकचरा निर्मिती आणि विल्हेवाट-**</u>

**घरगुती कचरा जागेवर संकलन आणि पृथ्थकरण करुन महानगरपालिकेकडे सुपुर्द केला जाईल.**

- वरिल बाब आम्हांला समजून सांगण्यात यावी.

श्री अरुण पाटील यांनी सांगितले की जर का हा मुद्द्याबाबत पर्यावरण सल्लागार यांना स्पष्टीकरण करता येत नसेल, तर मी स्पष्टीकरण देतो — विद्यामान प्रकल्पात सदरहू कच-याची विल्हेवाट कोणामार्फत होते याबाबतचा अर्ज ग्रामपंचायत कार्यालयात कंपनीकडून आलेला नाही.

<u>मुद्दा क्रं.- 2-</u>

**पर्यावरण जैविक अभ्यास दरम्यान अभ्यास क्षेत्रात धोक्यात आलेल्या आणि स्थानिक प्रजाती आढळलेल्या नाहीत.**

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की शेडुल्य 1 मधील कुठलीच प्रजाती आढळून आलेली नाही. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी जे शेडुल्य 1 पारित केलेले आहे,

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की शेडुल्य 1 मध्ये ज्या critically endangered species आहेत, त्या येथे नाहीत. त्याची बरीच मोठी यादी आहे.

श्री अरुण पाटील यांनी मागणी केली की याबाबतचा विस्तृत अहवाल सादर करण्यात यावा. या भागातील अनेक प्रजातींची सुची आम्हांला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून अवगत करण्यात यावी.

<u>मुद्दा क्रं. 3 -</u>

**गावामध्ये पिण्याचे पाणी,स्वच्छता,आरोग्य,पायाभूत सुविधा होत्या.**

पर्यावरण सल्लागार यांनी सुविधा आढळल्या असे सांगितले. श्री अरुण पाटील यांनी त्यांचा तुमच्या प्रकल्पाशी संबंध काय आहे याबाबत विचारणा केली.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, 2006 नुसार ज्या काही मार्गदर्शक तत्वे आहेत, त्यानुसार 10 कि.मी. परिघातील जी गावे आहेत, तेथील सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचा उल्लेख अहवालात करावा लागतो. जे आढळून आले, त्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे.

**सदरहू कंपनीने ग्रामपंचायती हद्दीमध्ये कुठल्या उपाययोजना केलेल्या आहेत, याबाबत अहवाल सादर करावा.**

<u>पान नं. 7 –</u>

**वायू प्रदूषकासाठी एचएलई विभागाकडून दरमहा कार्यक्षेत्रात वायू परिक्षण केले जाईल व नमुने घेतले जातील. नमुने घेण्याची स्थाने निश्चित करण्यात येतील.**

**कंपनीमध्ये भेट दिली असता विद्यमान प्रकल्पाबाबतच्या परिक्षण नोंदी व्यवस्थापनाने असमर्थता दर्शविली. अशा नोंदी उपलब्ध नसल्याचे सांगितले.**

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्पात Continuous Monitoring System आहे, त्याचे एक कनेक्शन हे मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ येथे आहे.

त्यावेळी श्री अरुण पाटील यांनी विचारणा केली की या नोंदी कंपनीत उपलब्ध असाव्यात का नाही.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पोर्टलवर त्वरित अपलोड करण्यात येते.

श्री अरुण पाटील यांनी येथे मत मांडले की कार्यरत प्रकल्पाविषयी अहवालात काहीच माहिती दिलेली नाही. ती असणे अपेक्षित होती.

**पान नं. 7 –**

**आजूबाजूच्या समुदायामध्ये आणि विशेषत: प्रकल्प स्थानाच्या हवेच्या दिशेला असणा-या भागात पर्यावरणीय कारण मुद्दे प्रतिकूल परिणामांच्या कोणत्याही संभाव्य निर्देशकाबाबत स्थानिक डॉक्टरांकडून वेळोवेळी अभिप्राय, नियमितपणे आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात येतील.**

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ते प्रस्तावित आहेत.

**श्री अरुण पाटील यांनी सांगितले** की विद्यामान प्रकल्पांतर्गत सदरहू कंपनीने आतापर्यंत माहिम ग्रामपंचायत क्षेत्रात संदर्भीय बाबतीत कुठल्याही शिबिराचे आयोजन केलेले नाही.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, 2006 नुसार जी ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. त्याआधी सदरहू प्रकल्प हा ईआयए, 2006 अधिसूचनेच्या अंतर्गत/purview मध्ये नव्हता. हा प्रकल्प 2004 साली स्थापन झाला.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पाचे ईआयए अधिसूचना, 2006 मध्ये वर्गीकरण हे 2015 मध्ये झाले. याअगोदर अशा प्रकल्पांना पर्यावरण अनुमती (ईसी) प्राप्त करणे आवश्यक नव्हते, फक्त महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी आवश्यक होती.

येथे सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी माहिती दिली सदरहू संवर्गातील प्रकल्पांना 2006 ची ईआय़ए अधिसूचना 2015 साली लागू झाली.

त्यावेळी श्री अरुण पाटील यांनी विचारणा केली की हा प्रकल्प 2004 साली स्थापन झाला. जर 2015 ला हा प्रकल्प अंतर्भूत झाला, तर आता 2025 आहे, त्यांना त्यावेळेस सर्व अटी व शर्ती लागू नव्हत्या का? इतकी वर्षे कंपनीने काय केले?

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की येथे संवादामध्ये अंतर येत आहे. हा प्रकल्प 2004 साली सुरु झालेला आहे. यापूर्वी पर्यावरण अनुमतीची आवश्यकता नव्हती. या प्रकल्पाचा समावेश 2015 साली पारित अधिसूचनेनुसार करण्यात आलेला आहे. आता प्रकल्प प्रवर्तकांचा विस्तारिकरणाचा प्रस्ताव असल्याने त्यासाठी ईआयएची तरतुद व पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी लागू झालेली आहे.

**पान नं. 7 – तक्ता क्रमांक 2.0 – सीईआरचे अंदाजपत्रक**

**तर हा मुद्दा लागू पडतो का?**

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सीईआर आता लागू होईल.

श्री पाटील यांनी विचारणा केली की कार्यरत प्रकल्पास हा मुद्दा लागू होतो का?

पर्यावरण सल्लागार यांनी नाही सांगितले.

**पान नं. 8 -**

**अशा प्रकल्पामुळे स्थानिक लोकांचे राहणीमान निश्चितच सुधारेल. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीमुळे आजूबाजूच्या परिसरातील भौतीक आणि सामाजिक पायाभूत सुविधांमध्ये निश्चितच सुधारणा होईल.**

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सीईआर उपक्रमात आपण पायाभूत सुविधा प्रस्तावित करत आहोत. त्यामुळे स्थानिकांना फायदा होईल.

श्री अरुण पाटील यांनी काय फायदा होईल याबाबत माहिती विचारली –

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सौर उर्जा, संगणक विकास केंद्र, हरितपट्टा जो महानगरपालिका क्षेत्रात आहे, शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय करणे, इ. आहेत.

सीईआर अंदाजपत्रक दर्शविलेले आहे, त्यानुसार त्या उपक्रमात तेवढी रक्कम खर्च करण्यात येईल.

श्री पाटील यांनी प्रश्न विचारला की 2004 पासून ही कंपनी स्थापित आहे. त्यांनी एक रुपयाचा खर्च माहिम गावासाठी केलेले आहे काय? यातच प्रकल्प प्रवर्तकांची सामाजिक बांधिलकी ही दिसून येते.

**<u>पान नं. 28 मुद्दा क्रमांक 15 –</u>**

वृक्षारोपण क्षेत्र – विद्यमान – 150 चौरस मीटर

प्रस्तावित क्षेत्र – 1500 चौरस मीटर

श्री अरुण पाटील यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास विचारणा केली की विद्यमान वृक्षारोपण क्षेत्राविषयी मत मांडावे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की क्षेत्र अधिकारी यांना प्रकल्प स्थानावरिल सद्यस्थिती पाहणीसाठी उद्या पाठविण्यात येईल.

**<u>पान नं. 28 - मनुष्यबळ आवश्यकता –</u>**

विद्यमान – 40

आम्ही प्रकल्पास भेट दिली असताना तेथे 40 कामगार आढळले नाहीत. कामगारांचा हजेरीपट मागितला असता तो देण्यात आलेला नाही. अभ्यागत नोंद वही नाही. तसेच 40 मनुष्यबळाचा भविष्यनिर्वाह निधी नियमानुसार भरतात का याविषयी काहीही माहिती देण्यात आली नाही.

**<u>पान नं. 29 – मुद्दा क्रं. 23-</u>**

**<u>उपलब्ध बेडची संख्या –</u>**

**<u>विद्यमान - 11,000</u>**

**<u>प्रस्तावित - 20,000</u>**

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की हा अहवाल ईआय़ए कोऑर्डीनरेटरने बनविलेला आहे. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की यामध्ये किती बेड्स कव्हर होतील याबाबत माहिती आहे. येथे बेड्स घेणार नाहीत. प्रकल्पाची क्षमता, येणारा कचरा किती येणार आहे यासाठी ही माहिती दिलेली आहे.

**पान नं. 32 – प्रकल्पाला लागणारे मनुष्यबळ –**

**यात प्रकल्पास आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता, आवश्यक असणारे कौशल्य, विशेष पदवी/पदविका/प्रयोगशाळा तंत्रज्ञ याबाबत माहिती नाही.**

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पदनाम (post/designation) दिलेले आहे.

श्री अरुण पाटील यांनी सांगितले येथे शैक्षणिक अहर्ता लिहिणे महत्वाचे आहे. पर्यावरण सल्लागार यांनी ती अंतिम अहवालात नोंदण्याचे आश्वासन दिले.

**पान नं. 32-**

**आधिचे प्रदूषण किंवा पर्यावरण हानीला सामोरे गेलेले क्षेत्र, पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र वन्य जीवन भाग येत नाही. याचा अर्थ आपले म्हणणे आहे की आजूबाजूला वन्यजीवनाचा कुठलाच भाग नाही.**

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की या मुद्द्यात राष्ट्रीय उद्यान, आरक्षित वने यांबाबत उत्तरे देणे अपेक्षित असते. येथे 10 कि.मी. परिघात ती नाहित. तमारे व वाकसाईचा जो भाग आहे तो 10 कि.मी. परिघात असून प्रकल्प प्रवर्तकांनी वनविभागाचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक होते.

**पान नं. 36 – मुद्दा क्रमांक -2/2-**

खालील बाबी उपलब्ध आहेत-

प्रशासकीय इमारत, कर्मचारी विश्रांती गृह, वाहनकक्ष क्षेत्र, कचरा साठवण कक्ष, सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा, प्रयोगशाळा,

श्री अरुण पाटील यांनी आक्षेप नोंदविला की येथील प्रशासकीय इमारत ही अनधिकृत्त आहे. ग्रामपंचायतीकडून कुठलीच परवानगी नाही.

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्वांना विनंती केली की येथे पर्यावरणविषयक प्रश्नच उपस्थित करण्यात यावेत.

श्री अरुण पाटील यांनी माहिती दिली की येथे कर्मचा-यांना कुठलेही विश्रांतीगृह नाही.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पात रेस्टरुम व वॉशरुमची सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

**वाहन धुण्याचे यंत्र:-**

**तेथे आम्हांला आढळले नाही**

**सुरक्षा कक्ष:-**

**प्रकल्पात येणा-यांची, अभ्यागतांची नोंदी होण्यासाठीची कुठलीही सुविधा तेथे नाही.**

**वाहनतळ आणि पार्किंग क्षेत्र:-**

**आढळले नाही.**

**पावसाच्या पाण्याचे संकलन:-**

**पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की रेनवॉटर हार्व्हेस्टिंग सयंत्रणा नाही.**

पान नं. 42- मुद्दा क्रमांक 18

**लेखा परिक्षण**

**विद्यमान प्रकल्पात कागदपत्रांची मागणी केली असता उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले.**

**पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की लेखापरिक्षण हे प्रस्तावित आहे.**

पान नं. 64-

**पर्यावरणीय गुणवत्तेचे मुल्यांकन करण्यासाठी दिनांक 01 जानेवारी ते 31 मार्च 2025 आठ ठिकाणी निरिक्षण केले.**

त्यात पाटीलवाडी, डुंगीपाडा, धोंडलपाडा, माकुंसर, मांगेलवाडा, वडराई व सातपाटी – येथे पाण्याचे, हवेचे , जमिनीचे मुल्यांकन करण्यात आलेले आहे. तर याठिकाणी गावातील एखादा माणूस दाखवावा की त्याने यांना तेथे पाहिले. आमची मागणी आहे की स्थानिक प्रशासनास माहित पाहिजे की कुठल्याप्रकारचे सर्वेक्षण व परिक्षण करण्यात येत आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की एनएबीएल प्रयोगशाळाचा संघ येथे येऊन त्यांनी परिक्षण केलेले आहे व त्याचे फोटो सादरीकरणात दर्शविलेले आहेत.

पर्यावरण सल्लागार यांनी परत सर्व फोटो, प्रकल्प स्थानावरित फोटो व सर्वेक्षण करतानाचे सर्व फोटो दाखविले.

**<u>पान नं. 88 –</u>**

पालघरमधील आदिवासी समुदायाकडे स्थानिक वनस्पती, प्राण्यांविषयी मौल्यवान पारंपारिक ज्ञान आहे. जे संरक्षक आणि शाश्वत संस्था व्यवस्थापनासाठी उपयोगी ठरेल.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की हा जो भाग असतो, ही जनगणनेतील माहिती असते. त्या आधारवर येथे हे सांगण्यात आलेले आहे.

येथे श्री अरुण पाटील यांनी सांगितले की येथे व्यवस्थापनासाठी उपयोगी ठरेल म्हणजे काय?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की येथील स्थानिक वनातील स्थानिक वनस्पतीचा उपयोग.

श्री अरुण पाटील यांनी आक्षेप नोंदविला की सादरीकरणात वने नाहित असे सांगितले, मात्र वनसंरक्षक कायद्यानुसार येथील वने हे संरक्षित करण्यात आलेली आहेत.

**<u>पान नं. 92 –</u>**

प्रकल्प स्थळ आजूबाजूच्या कृषि जमीनीपेक्षा उंच असल्याने पावसाचे पाणी वाहून जाण्यास मदत होईल.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्प स्थळावरुन कोणताही विसर्ग होणार नाही. याचा अर्थ प्रकल्पाची जागा ही वर आहे. प्रकल्प हा झेडएलडी असल्याने प्रकल्पातून प्रक्रिया केलेल सांडपाणी हे बाहेर जाणार नाही.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की सोप्या भाषेत उत्तर देण्यात यावे की चढावावर जागा आहे. त्यामुळे पाणी साचणार नाही.

श्री अरुण पाटील यांनी मत मांडले की प्रकल्पात प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित नाही. प्रकल्प उंच भागावर आहे. म्हणून प्रकल्पातील प्रक्रिया न केलेले सांडपाणी हे खालील, आजूबाजूच्या शेतात जाणार आहे. त्यामुळे बाजूची शेती ही प्रदूषित होणार आहे. त्यामुळे रेन वॉटर हार्व्हेस्टींग प्रमाणे प्रकल्पात रेनवॉटर ड्रेनेज असले पाहिजे. तेथे ती व्यवस्था नाही.

<u>पान नं. 97 –</u>

घनकण पदार्थामुळे वातावरणातील पी.एम. 2.5, पीएम – 10 चे प्रमाण वाढेल. त्यामुळे प्रदूषणाचा घनकण पदार्थामुळे प्रदूषणाच्या पातळीत वाढ होईल. या प्रदूषित हवेने सातत्याने श्वसन केले, त्यांना फुप्फुसाचे आजार होण्याची शक्यता आहे. याबाबत खुलासा करावा.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रस्तावित विस्तारिकरणासंबंधी लिहिलेले आहे. यामध्ये शमन उपाय म्हणून स्क्रबर उपलब्ध करण्याची तरतुद केलेली असून त्याचे अंदाजपत्रकात मंजूरी मिळालेली आहे.

<u>पान नं. 101 -</u>

**<u>जलगुणवत्तेवर परिणाम -प्रतिबंधक उपाय योजना परिणाम-</u>**

विद्यामान प्रकल्पात याबाबत जो प्रकल्प आहे, तो झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे.

या स्थळाला चांगले रस्ते आहेत.

आधी अप्रोच रस्ता होता, मात्र काल प्रकल्पात गेलो, तेव्हा रस्ता चांगला नव्हता. तेथील रस्ता चांगला करण्याची, त्याचप्रमाणे ती प्रकल्प व्यवस्थापनाचीसुध्दा आहे. या प्रकल्पस्थाळाच्या

भागातील रस्ते अत्यंत खराब आहेत. त्यामुळे आपत्कालिन परिस्थितीत हा प्रकल्प धोकादायक असू शकतो. तरी तेथील रस्ते तयार केल्याशिवाय या प्रकल्पास मंजूरी देऊ नये. श्री अरुण पाटील यांनी सांगितले प्रकल्पात कुठेही फरशी,फेव्हर नाही. तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कंपनीची पाहणी करावी. आमच्या येथील बरेच कामगार तेथे काम करतात. प्रदूषणाचा प्रश्न असेल, तर स्थानिक प्रशासनाने योग्य ती कारवाई केली पाहिजे. त्यांनी पर्यावरण सल्लागार यांना कंपनीचा बोर्ड कसा असतो ते स्क्रीनवर दाखविण्याची सूचना केली. त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की त्यांना आता दर्शनी भागावर बोर्ड लावलेला आहे.

श्री अरुण पाटील यांनी मागणी केली की कशाप्रकारचा बोर्ड असावा, त्याची साईझ, याबाबत माहिती द्यावी.

श्री अरुण पाटील यांनी आक्षेप नोंदविला की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ज्या कंपन्यांवर कारवाई केली, त्याचा अहवाल उपलब्ध करण्यात आलेला नाही.

मी माहिम ग्रामपंचायत व नागरक यांच्यामार्फत विनंती करतो की संदर्भीय बाबींचा विचार करता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कंपनीस गेले दोनवर्षेपर्यत कुठलीही भेट दिलेली नाही. प्रस्तावित प्रकल्पात आवश्क असणा-या उपाययोजना कार्यरत प्रकल्पात अस्तित्वात नाहीत. तरी विद्यमान प्रकल्प प्राधान्याने सुरळीत करणे आवश्यक आहे. पाणी, हवा, जमिन यांचे होणारे प्रदूषण पाहता प्रस्तावित प्रकल्पास मंजूरी देणे योग्य होणार नाही. तरी याबाबत माहिम व सर्व ग्रामस्थ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीच या प्रकल्पाच्या विस्तारिकरणास पूर्ण विरोध करत आहोत.

13) **श्री विकास मोरे,माजी सरपंच, माहिम, तालुका, जिल्हा-पालघर:-**

सादरीकरणात तक्ता दाखविला. तर इन्सिनरेटर जे आहे, त्याची क्षमता किती आहे?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले कि 75.0 किलो प्रति तास एवढी क्षमता आहे.

श्री विकास मोरे यांनी विचारणा केली की उत्पादन घेताना जो लगदा तयार होतो, त्याचे काय करतात?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले जी राख उत्पन्न होते, तिस तळोजाला CHWTSDF ला जाते.

श्री विकास मोरे यांनी प्रश्न विचारला की लगदा काढण्यास आमचे स्थानिक कामगारच असतात. तसेच काचेचे काय केले जाते. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की काच ऑटो क्लेव्हमध्ये स्वच्छ करुन ती पुनर्वापर करण्यासाठी जाते. काच ही इन्सिनरेटरमध्ये जात नाही.

14) **श्री राजाराम दत्तात्रय साळसकर, राहणार-वेवूर, पालघरजवळ पूर्वेला, पालघरः-** आतापर्यत मी प्रदूषण नियंत्रण मंडळ व पर्यावरण संरक्षण याबाबत बरेच वाचन केलेले आहे, विचार केलेला आहे. आजची सुनावणी मला ऐकल्यानंतर माहिम ग्रामपंचायतीचे प्रथम अभिनंदन करायचे आहे. परंतु आतापर्यत जे काही मुद्दे काढलेत, ते कार्यरत प्रकल्पाबाबत आहेत. आपला विस्तार हा शब्द वापरला जातो. येथे कार्यरत प्रकल्प पसरणार नाही. तर ज्वलन हा जो काही भाग आहे,कचरा जास्त आल्याने ज्वलन करण्यासाठी फक्त इन्सिनरेटर मोठ्या क्षमतेचा स्थापित करायचा आहे. आपल्या सूचना, शंका या योग्य आहेत. उपस्थितांनी पर्यावरणविषयक प्रश्न पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीस विचारले, तेही योग्यच आहेत. पण जो पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल जो तयार केलेला आहे, त्यातील बरेच मुद्दे हे प्रस्तावित भागाशी आहेत. आपण केलेल्या सूचना या स्विकार्य आहेत. माहिम ग्रामपंचायत प्रत्येक उद्योगाबाबत एवढी जागरुक असेल, असेत मला कधिही वाटलेच नाही. माझे अनेक मित्र माहिममध्ये आहेत. त्यामुळे एवढेच म्हणणे आहे की प्रदूषण नियंत्रण मंडळ हे तांत्रिक बाबींची परिक्षा करतच असते. आता या कंपनीने जे प्रस्तावित केले, तो इन्सिनरेटर मोठ्या क्षमतेचा/क्रयशक्तीचा बसवावा. यामध्ये पाण्याची अतिरिक्त गरज/वाढ ही संभाव्य/अपेक्षित म्हणून विचार

करण्यात आलेली आहे. त्याबाबत सुधारणा करायची असेल, तर ग्रामपंचायत ती केव्हाही करु शकते. मीसुध्दा येईन, मला यात स्वारस्य आहे.

मी कंपनीचा कोणीही नाही. कंपनीत असणारा माझा मुलगा हा सज्ञान आहे. त्याच्या व्यवहारात मी कधिही लक्ष देत नाही. आज माझे वय 86 वर्ष आहे. त्यामुळे मी बघत नाही. परंतु प्रदूषण नियंत्रण आणि पर्यावरण संरक्षण यात माझे बरेच वाचन झालेले आहे. त्यामुळे मी कंपनीच्या बाजूने बोलतो असे कोणीही म्हणू नये. माहिम ग्रामपंचायतीच्या सदस्याने असा विचार करु नये की मी कंपनीची वकिली करण्यासाठी उभा आहे. कारण या भागात गेले 70 वर्ष मी राहतो.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे तांत्रिक बाबतीतील शासनाचे कार्यालय आहे. तांत्रिक बाबींची जर पूर्ती होत असेल, तर कंपनीचा विस्तारिकरणाचा प्रस्ताव मान्य करण्यास हरकत नाही असे माझे मांडणे आहे. ग्रामपंचायत सदस्यांनी उपस्थित केलेल्या सूचनाही रास्त आहेत. त्याबाबत प्रकल्प प्रवर्तक व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने योग्य ती कार्यवाही करावी, अशी माझी विनंती आहे.

15) **<u>प्रीती अरुण पाटील, सरपंच, ग्रामपंचायत, माहिम, तालुका, जिल्हा-पालघर:-</u>**

आता श्री साळस्करसाहेबांनी जे मुद्दे मांडलेले आहेत. त्यांनी मी कंपनीचा कोणी नाही असे म्हणाले. मी म्हणते कंपनीत आमचीच माणसे आहेत. कंपनी माहिम ग्रामपंचायत हद्दीत आहेत. तेथे काम करणारी माणसेही आमचीच आहेत.

बैठकीच्या सुरवातीस मी विवेचन केले त्यानुसार अनेक मुद्दे जरी आले असले, तरी एकच निष्कर्ष निघतो की आता प्रकल्पात असणारे व्यवस्थापन तितकसे परिपूर्ण नाही. तरी ते परिपूर्ण करुन भविष्यात विस्तारिकरणाचा प्रस्ताव आला, तर त्याचा विचार करण्यात यावा. सद्यस्थितीत तो करु नये. कारण कार्यरत प्रकल्पात जे काही बदल

आवश्यक असतील, ते आता होण्याचे तेथील वातावरण नाही. भविष्यात जर प्रकल्पातील स्थिती समाधानकारक असली, तर विचार केला जावा.

मला एक मुद्दा अधोरेखित करावासा वाटतो की एकंदरीत तेथे काम करणारे जे कामगार आहेत, ते माहिम ग्रामपंचायत हद्दीतीलच बरेसचे लोक आहेत. त्यांच्या आरोग्याच्या प्रश्न आम्हांला महत्वाचा आहे. तरी कार्यरत प्रकल्पात सक्षम आरोग्य यंत्रणा राबविली जावी. ती दिसत नाही. सर्व कामगार ही आमची माणसे आहेत. त्यांचे आरोग्य चांगले राहणे हे आमचे व प्रकल्प प्रशासनाचेही कर्तव्य आहे.

16) **श्री अनंत माधव जनाते, राहणार-पालघरः-**

जेव्हा ही कंपनी चालू झाली. तेव्हा मी बेरोजगार होतो. कंपनीच्या मालकांनी आम्हांला रोजगाराची संधि व प्रेम दिले, त्यामुळे आमची आर्थिक प्रगती झाली. उपस्थितांनी घेतलेले आक्षेप हे बरोबर किंवा चुकीचे असू शकतात. पण ग्रामपंचायतीने आमची काळजी घ्यायला पाहिजे. त्यामुळे विस्तारिकरण आवश्यक आहे. प्रकल्पातील कामगारांचा पूर्ण परिवार या कंपनीवर अवलंबून आहे.

येथे प्रीती पाटील यांनी मत मांडले की श्री जनाते यांनी सूचना करण्याअगोदरच मी सांगितलेले आहे की ही माझी माणसे आहेत. कार्यरत प्रकल्प बंद करण्याचा प्रश्नच येत नाही. कार्यरत प्रकल्पातील त्रुटी दूर करुन भविष्यात विस्तारिकरणाचा विचार व्हावा. ग्रामपंचायत ही सर्वांसोबत आहे. कार्यरत प्रकल्पात कामगारांना आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करण्यात याव्यात. पुढच्या जनसुनावणी आम्ही आनंदाने येऊ व प्रकल्प विस्तारिकरणास पाठिंबा देऊ.

17) **श्री सुजय मोरे, राहणार-माहिम गांव, तालुका, जिल्हा-पालघरः-**

अहवालातील पान नं. 54, त्यात एंबियंट गुणवत्ता मानके आहेत, जीएसआर 826 (ई), जी अनुज्ञेय मर्यादा पारित केलेली आहे, पीएम 10, पीएम 2.5, एसओटु हे काय आहे याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे. हे बरोबर आहेत काय?

श्री सुजय मोरे यांनी सांगितले की जीएसआर निर्देशांनुसार 100 आणि 60 अशा दोन अनुज्ञेय मर्यादा पारित केलेल्या आहेत. अहवालात फक्त 100 लिहिलेले आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की चोवीस तासाचे दिलेले आहेत. श्री सुजय मोरे आक्षेप नोंदविताना सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण विभागाच्या मानकांनुसार आठ तासांसाठी 100 असते. वार्षिक 60 असते. श्री मोरे यांनी आक्षेप नोंदविला की आठ तासाची देखरेख केलेली नाही, तर फक्त सरासरी काढलेली आहे.

श्री सुजय मोरे यांनी आक्षेप नोंदविला की अहवालात फसवी माहिती दिलेली आहे.

श्री मोरे यांनी पुढे आक्षेप नोंदविला की प्रकल्पास भूगर्भातील पाणी उपसाची परवानगी ही 9.0 केएलडी एवढीच आहे. तर आपण 15.0 केएलडी पाणी वापरणार आहात. तर ती तफावत कशी भरुन काढणार आहात?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले त्याबाबत सर्व शासकीय पूर्व परवानगी या घेतल्या जातील. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पाण्याची गरज ही टँकरव्दारे, पाणी पुनर्वापरव्दारे भागविण्यात येईल.

श्री सुजय मोरे यांनी मत मांडले की अहवालात दिलेली माहिती ही अपुरी व खोटी आहे याची नोंद घेण्यात यावी. ईआयए अधिसूचना, 2006 नुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी. पर्यावरण सल्लागार यांनी स्पष्टीकरण दिले की तक्यामध्ये ताजे पाणी जे दिले, ते 5.5 व 1.5 असे आहे. आम्हांला 7.0 केएलडीच पाणी लागणार आहे.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी स्पष्टीकरण देताना सांगितले की आम्हांला 7.0 केएलडीच पाणी लागणार आहे. बाकीचे केवळ पुनर्वापर पाणीच वापरले जाणार आहे. श्री सुजय मोरे यांनी टीओआर तपासण्याची विनंती केली.

श्री अरुण पाटील यांनी विचारणा केली की जो मुद्दा उपस्थित करण्यात आला – जलगुणवत्तेवर परिणाम व शमन उपाय योजना. या प्रकल्पात बांधकाम टप्प्यात पाण्याचा स्त्रोत ही बोअरवेल असेल. त्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र आधिच प्राप्त झालेले आहे. मुळ

प्रकल्पासाठी ना हरकत प्रमाणपत्र आधिच प्राप्त झालेली असल्याने विस्तारासाठी अतिरिक्त ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही. परिसरतील जलस्त्रोतावर कोणताही लक्षणीय परिणाम होणार नाही.

पर्यावरण सल्लागार यांनी स्पष्टीकरण दिले की 9.0 केएलडीची परवानगी प्राप्त आहे.

श्री अरुण पाटील यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस विनंती केली की या अहवालाचा पुर्नविचार करण्यात यावा. तसेच आम्ही केलेली कार्यरत प्रकल्पातील प्रथम त्रुटी दूर करुन नंतरच विस्तारिकरणास परवानगी द्यावी अशी आमची मागणी आहे. आपण जो दस्तावेज शासनास सादर करणार आहात, त्याचा पत्ता, फोन नंबर बैठकीनंतर उपलब्ध करण्यात यावा.

श्री अरुण पाटील यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस विनंती केली की या अहवालाचा पुर्नविचार करण्यात यावा. अहवालात अनेक विसंगती आहेत. कार्यरत प्रकल्पात आढळेल्या त्रुटी दूर करुन परत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यात यावी.

आयोजक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी परत उपस्थितांना आवाहन केले की ज्यांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक लेखी सूचना, विचार वा आक्षेप नोंदवायच्या आहेत, त्यांनी सादर कराव्यात, त्याची पोच देण्यात येईल.

आयोजक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी परत उपस्थितांना आवाहन केले की कोणाला सूचना, आक्षेप नोंदवायचे असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनीही परत उपस्थितांना आवाहन केले की येथे ज्या सूचना,आक्षेप नोंदविण्यात आले, त्याशिवाय इतर सूचना, आक्षेप नोंदविण्याचे असल्यास त्या नोंदविण्यात याव्यात. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

आयोजक,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल सर्वांचे आभार मानले आणि मा. अध्यक्ष यांच्यावतीने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

जन सुनावणी दरम्यान प्राप्त झालेले १६ सूचना/आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

**(विरेन्द्र सिंह)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
तारापूर-2,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
बोईसर (पश्चिम),
तालुका,जिल्हा-पालघर

**(किरण हसबनीस)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
ठाणे

**(सुभाष भागडे)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी,पालघर,
जिल्हा – पालघर